# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172


*No: CGRF/AZ/AUR/ R / 259 / 2009 / 93/ Date :-*

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Rural Circle , M.S.E.D.C.L.,*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Asaram Keshaurao Kade,Post Waghadi Tq.Paithan, Dist. Aurangabad. (Consumer No. 494810000158)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect of Shri Asaram Keshaurao Kade,Post Waghadi Tq.Paithan,* Dist. Aurangabad..

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 01.12.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

Copy to:-
Shri Asaram Keshaurao Kade,
*Post Waghadi Tq.Paithan,*
***Dist. Aurangabad.***

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/२५९/२००९/९३**

| | |
|---|---|
| **तक्रार दाखल** | **दिनांक :- १९/११/२००९** |
| **निकाल** | **दिनांक :- १८/०१/२०१०** |

**श्री आसाराम केशवराव काळे,**
**मु.वाघाडी, पो. वडवाळी,**
**ता.पैठण, जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९४८१००००१५८)** **अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत ग्रामीण विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |
| | **वि. सु. काबरा** | **सदस्य** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १९/११/२००९ रोजी औरंगाबाद ग्रामीण परिमंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०१/१२/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) ग्राहकाने महावितरण कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला आहे.त्यांचा ग्राहक क्रमांक ४९४८१००००१५८ असा आहे. ग्राहकाने मार्च २००३ पर्यंत नियमीतपणे देयकाचा भरणा केलेला आहे.त्यांना ऑगस्ट २००३ मध्ये एकदम एकत्रीत ५०४०/- रुपये एवठ्या रकमेचे वीज बिल आले वरील अवास्तव बिलाबाबत त्यांनी उपविभागीय कार्यालय पैठण येथे दिनांक ०७/०६/२००४ रोजी तक्रार दाखल केली परंतु त्यांची देयक दुरुस्त करण्यात आले नाही व सरासरी आकारणीची देयके महावितरण कंपनीकडुन पुढेही देण्यात आली ग्राहकाने त्याचा भरणा न केल्यामुळे त्यांचे मीटर काढुन वीज पुरवठा ऑगस्ट २००६ मध्ये कायमचा बंद करण्यात आला. ग्राहकाने चुकीचे वीज देयक दुरुस्त करुन मिळणे बाबत महावितरण कंपनीकडे सतत पाठपुरावा करुन लेखी अर्ज दिलेले आहेत.

२) महावितरण कंपनीने त्यांचे वाणीज्य परीपत्रक क्रमांक ८३ दिनांक १५/०७/२००८ नुसार वीज पुरवठा कायम स्वरुपी खंडीत झालेल्या घरगुती वीज ग्राहकासाठी ( नव प्रकाश योजना ) कार्यन्वीत केली.त्या योजने नुसार ५० टक्के थकीत बाकी भरुन विद्युत पुरवठा सुरु करावा असा विनंती अर्ज ग्राहकाने दिनांक १४/०८/२००८, २४/०८/२००८ व २४/०९/२००८ रोजी महावितरण कंपनीकडे केला. परंतु ग्राहकाचे कनेक्शन कायम स्वरुपी खंडीत केल्यानंतरही त्यांची नोंद रेर्काड मध्ये न घेतल्यामुळे,आपले कनेक्शन कंपनीच्या रेर्काड नुसार सुरु असुन आपणास बिलींग सुरु असल्यामुळे नव प्रकाश योजनेचा फायदा आपल्याला मीळूशकत नाही असे महावितरण

कंपनीतर्फे सांगण्यात आले. ग्राहकाने नव प्रकाश योजनेची सविस्तर माहीती मीळण्या करीता माहीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये महावितण कंपनीकडे अर्ज करुन माहीती मागीतली आहे, तसेच त्यांचे प्रकरण वरील योजने अंतर्गत येत आसतांनाही त्यांना योजनेतील लाभापासुन वंचीत करण्यात आल्यामुळे त्यांनी दिनांक ०५/१२/२००८ रोजी वकीला मार्फत महावितरण कंपनीस नोटीस बजावली आहे. परंतु वरील सर्व पाठपुरावा केल्यानंतरही महावितरण कंपनीने त्यांना न्याय न दिल्यामुळे व विद्युत पुरवठ्या पासुन वंचीत ठेवल्यामुळे त्यांनी या मंचात तक्रार दाखल करुन वीज बिल दुरुस्त करुन देणे,नव प्रकाश योजने अंतर्गत समाविष्ठ करुन घेऊन वीज पुरवठा सुरु करणे,व मागील चार वर्षापासुन विज पुरवठ्या पासुन वंचीत ठेवल्यामुळे झालेल्या मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई मिळवुन देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली.

३) दिनांक १९/११/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस नोडल अधिकारी प्रतिनिधी श्री आर.पी. चव्हाण सहाय्यक अभियंता पैठण व वीज ग्राहक उपस्थित होते.ग्राहकाने वरील प्रमाणे तक्रार कथन केली.नोडल अधिकारी यांनी प्रकरणाबाबत निवेदन सादर करण्याकरीता एक आठवड्याची मुदत देण्याची विनंती मंचास केली.मंचाने नोडल अधिकारी यांना ग्राहकाची सी.पी.एल.,पी.डी.रिपोर्ट सादर करण्याचे सांगुन पुढील सुनावणी दिनांक ०८/१२/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

४) दिनांक ०८/१२/२००९ रोजी झालेल्या सुनावणी नोडल अधिकारी यांचा प्रतिनिधी श्री आर.पी.चव्हाण, श्री पी.डी.गोसावी सहाय्यक लेखापाल व वीज ग्राहक उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी आपले निवेदन ग्राहकाचे सी.पी.एल.सादर करतांना सांगीतले की, ग्राहकाचा विद्युत पुरवठा दिनांक १७/०८/२००६ रोजी कायमचा बंद करण्यात आला.परंतु त्याचा अहवाल

उशिरा प्राप्त झाल्यामुळे ग्राहकास  नव प्रकाश योजनेचा फायदा देता आला नाही ग्राहकाकडे मार्च २००९ अखेर  रुपये १८०२४.२१/- थकबाकी असल्यामुळे नव प्रकाश योजनेच्या परीपत्राका नुसार त्यांनी रुपये ५०००/- चा भरणा केल्यास उर्वरीत थकीत बाकी माफ करुन विद्युत पुरवठा सुरु करण्यात येईल. नोडल अधिकारी यांना ग्राहकाचे २००३ पासुन सी.पी.एल.व पी.डी. अहवालाची प्रत दिनांक ११/१२/२००९ ला सादर करण्याचे सांगुन प्रकरण निकालासाठी ठेवले.

५) दोन्ही बाजुकडुन सादर करण्यात आलेल्या कागद पत्रावरुन व जबाबावरुन असे दिसुन येते की,ग्राहकास माहे ऑगस्ट २००३ मध्ये एकत्रीत युनिटचे रुपये ५०४०/- रकमेचे देयक देण्यात आले. वरील अवास्तव देयक दुरुस्त करुन मीळण्याबाबत ग्राहकाने महावितरण कंपनीकडे वारंवार अर्ज करुन विनंती केली परंतु मीटर रिडींग नुसार देयक दुरुस्ती न करता त्यांना सरासरी आकारणीची व आवास्तव रक्कमेची वीज देयके देण्यात आली.व शेवटी ग्राहकाने त्यांचा भरण न केल्यामुळे त्यांचा वीज पुरवठा १७/०८/२००६ रोजी कायमचा बंद करण्यात आला. त्यानंतरही ग्राहकाने वीज देयक दुरुस्ती बाबत व वीज पुरवठा पुर्नजोडणी बाबत कंपनीकडे अर्ज करुन पाठपुरावा केल्याचे दिसुन येत आहे.त्याबाबतीत ग्राहकाने महावितरण कंपनीच्या उपविभागीय अधिका-यास दिलेल्या अर्जाच्या वरील प्रति मंचात सादर केल्या आहेत. महावितरण कंपनीने त्यांचे प्रीप्रत्रक क्रमांक ८३ दिनांक १५/०७/२००८ नुसार वीज पुरवठा कायम स्वरुपी खंडीत करण्यात आलेल्या वीज ग्राहकासाठी '' नव प्रकाश योजना '' सुरु केल्यानंतर ग्राहकाने वरील योजने अंतर्गत थकीत बाकी भरुन वीज पुरवठा सुरु करण्याबाबत महावितरण कंपनीकडे अर्ज दाखल केल्याचे दिसुन येते.परंतु वीज पुरवठा कायमचा बंद केल्यानंतर दोन वर्षाच्या कालावधीत सुध्दा त्याची नोंद न घेतल्यामुळे ग्राहकास बिलींग सुरुच होते. त्यामुळे कनेक्शन बंद असतांनाही, तुमचे कनेक्शन आमच्या रेकार्ड नुसार सुरुच आहे त्यामुळे वरील योजनेचा फायदा आपणास मीळु शकत नाही असे ग्राहकास सांगण्यात आले. पी.डी.चा

अहवाल उपविभागीय कार्यालयास उशिरा प्राप्त झाल्यामुळे ग्राहकाचे बिलींग विद्युत पुरवठा बंद असतांनाही दोन वर्षापर्यंत पुढे सुरुच असल्याचे सहाय्यक अभियंता यांनी त्यांच्या निवेदनात मान्य केले आहेत.

६) नव प्रकाश योजने अंतर्गत समाविष्ठ न केल्यामुळे ग्राहकाने माहीतीचा अधिकार अधिनियम २००५ चा उपयोग करुन सदर योजना कशी राबवीली जाते,ग्राहकांना त्यांचा कशा प्रकारे फायदा दिला जातो,त्यासाठी गाहकाची पात्रता कशी असावी इत्यादी माहीती दिनांक १३/१०/२००८ च्या अर्जानुसार महावितरण कंपनीच्याकडे मागीतली होती.कंपनीने त्यांचे उत्तर देतांना ग्राहकास त्याचे परीपत्रक दिल्याचे दिसुन येत आहे. ग्राहकाने त्यांचे वकील ॲडव्होकेट अशोक बी.पाचोडे मील कार्नर औरंगाबाद यांच्या मार्फत महाविरतण कंपनीस दिनांक ०५/१२/२००८ रोजी लेखी नोटीस पाठवुन १५ दिवसाच्या आंत नव प्रकाश योजने अंतर्गत थकीत बाकी भरुन घेवुन वीज पुरवठा सुरळीत करुन द्यावा अशी मागणी केलेली आहे. ग्राहकाचे वरील सर्व प्रयत्नाचा महावितरण कंपनीच्या संबंधीत कार्यालयावर काहीही परीणाम झालेला दिसुन येत नाही. ग्राहकाची मागणी न्याय असतांना व पैसे भरण्याची तयारी असतांना सुध्दा ग्राहकाला ४ वर्षापासुन विद्युत पुरवठा मीळण्यास वंचीत ठेवण्यात आल्याचे दिसुन येत आहे. वरील बाबतीत महावितरण च्या संबंधित उपविभागीय कार्यालयाचा अनगोदी कारभार दिसुन येत आहे. त्यामुळे ग्राहक नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे.

७) नोडल अधिकारी यांनी माहे मार्च २००९ अखेर ग्राहकाकडे रुपये १८०२४.२१/- थकबाकी प्रलंबित असल्याचे प्रतिपादन केले आहे. परंतु त्यांनी सादर केलेल्या पी.डी.अहवालानुसार ग्राहकाचे कनेक्शन दिनांक १७/०८/२००६ रोजी कायमचे बंद करण्यात आले असुन त्यांच्या मीटरचे अंतीम वाचण ३९११ युनिट असे नोंदविले आहे.त्यामुळे पी.डी.च्या तारखेनंतर करण्यात आलेली आकारणी अयोग्य आहे. ग्राहकाचे सी.पी.एल.नुसार जुन २००३ मध्ये त्यांचे वाचण १५१२ युनिट दिसुन

येते.त्यामुळे जुन २००३ ते ऑगस्ट २००६ या कालावधीतील ग्राहकाचा वीज वापर (३९११ - १५१२)=२३९९ युनिट झालेला आहे. त्यामुळे वरील कालावधीत २३९९ युनिट वीज वापराची विभागणी करुन व त्यावेळच्या दराप्रमाणे आकारणी करुन ग्राहकाचे देयक निश्चीत करणे योग्य होईल.वरील प्रमाणे देयक निश्चत झाल्यानंतर नव प्रकाश योजनेच्या परीपत्राकातील कलम २ व ११ नुसार ग्राहकाकडुन थकीत बाकीच्या ५० टक्के रक्कम व विद्युत जोडणी आकार, अनामत रक्कम घेवुन विज पुरवठा सुरु करण्यात यावा.असे या मंचाचे मत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने ग्राहकाकडे दाखवीलेली प्रलंबित थकबाकी रुपये १८०२४.२१/- रद्द करण्यात येत आहे, त्याऐवजी ग्राहकास २३९९ युनिटची जुन २००३ ते ऑगस्ट २००६ या कालावधीत समान विभागणी करुन सुधारीत देयक देण्यात यावे.

२) सुधारीत देयक देतांना कोणतेही दंडाची व व्याजाची आकारणी करु नये.

३) नव प्रकाश योजनेच्या परीपत्रकानुसार सुधारीत देयकाच्या ५० टक्के रकमेचे देयक ग्राहकास वितरीत करावे, व त्याचा भरणा केल्यानंतर ग्राहकाचा वीज पुरवठा ताबडतोब सुरु करावा.

४) ग्राहकास झालेल्या मानसिक त्रासापोटी रुपये १०००/- नुकसान भरपाई द्यावी.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |

ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रामीण/२५९/२००९/९३/ दिनांक :-

प्रति,
श्री आसाराम केशवराव काळे,
मु.वाघाडी, पो. वडवाळी,
ता.पैठण, जिल्हा औरंगाबाद.
(ग्राहक क्र.४९४८१००००१५८)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/ग्रामीण/**२५९/२००९/९३** )

आपण दिनांक १९/११/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती,सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.